**मा.पंतप्रधानांनी स्वातंत्र्यदिनी जाहिर केलेले ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम प्राथमिक शाळांमध्ये पिण्याचे पाण्याची सोय करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र.ग्रापापु१००३ / प्रक्र२१० /पापु- ०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२., दिनांक: २७ फेब्रुवारी,२००४.**

**वाचा** : शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि. क्र.ग्रापापु१००३ / प्र.क्र.२१० /पापु- ०७
दिनांक १४ ऑक्टोबर २००३

**शासन निर्णय**

सन २००२ च्या उन्हाळयातील देशातील विविध भागातील पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई लक्षात घेऊन महाराष्ट्रासह देशातील १८ टंचाईग्रस्त राज्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी ग्रामीण पाणी पुरवठयाच्या तीन कार्यक्रमांची घोषणा मा.पंतप्रधानांनी स्वातंत्र्यादिनानिमित्त दि.१५ ऑगस्ट,२००२ रोजी राष्ट्रास उद्येशून केलेल्या भाषणात केली होती. हा कार्यक्रम राबविण्याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना संदर्भात नमूद केलेल्या दि.१४ ऑक्टोबर,२००३ च्या शासन निर्णयाद्वारे निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. ग्रामीण प्राथमिक शाळात घ्यावयाच्या पाणी पुरवठा योजनेच्या भांडवली किमतीच्या १०% भाग संबंधित योजनेच्या लाभार्थ्यांनी (संबंधित संस्थेने अथवा पालक-शिक्षक संघटनेने) उचलणे आवश्यक आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची संख्या ५०% पेक्षा जास्त असेल तर, लोकसहभागाची रक्कम ५% राहील. संबंधित शिक्षण संस्था, पालक-शिक्षक संघटना जर ही लोकसहभागाची रक्कम पूर्णपणे भरु शकत नसतील तर, लोकसहभागाची रक्कम संबंधित ग्रामपंचायतीने स्वत:च्या उत्पन्नातून भरावी. **संबंधित ग्राम पंचायतीची आर्थिक स्थिती चांगली नसल्यास, टंचाईग्रस्त भागात ही रक्कम आमदारांच्या स्थनिक विकास निधीमधून भरण्यास या योजनेपुरती हरकत नाही.**

३. हे आदेश नियोजन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(सुधीर ठाकरे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव

४. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
६. मा.अध्यक्ष,जिल्हा परिषद (सर्व)
७. मा. मुख्यसचिव
८. विभागीय आयुक्त (सर्व)
९. सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
१०. संचालक,भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा,पुणे
११. जिल्हाधिकारी (सर्व)
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
१३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१४. प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१५. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
१६. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१७. तहसीलदार (सर्व)
१८. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
१९. जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
२०. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
२१. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,ज़िल्हा परिषद (सर्व)
२२. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग,जिल्हा परिषद (सर्व)
२३. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांत्रिकी उपविभाग,जिल्हा परिषद (सर्व)
२४. गटविकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
२५. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
२६. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
२७. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
२८. उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
२९. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
३०. मंत्रालयातील इतर सर्व विभाग
३१. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने.
३२. निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग